महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात दिनांक : १७ मे, २०२३

**-: शुद्धीपत्रक :-**

**विषय : महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ (जाहिरात क्रमांक ११/२०२३)**
सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ' या संवर्गाकरिता 'B.E./B.Tech. [Production Engineering] पदवीधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या मागणीपत्रानुसार सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाच्या भरतीकरिता दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक २८१/२०२३ प्रकरणी दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी झालेलया अंतरिम आदेशासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल संकीर्ण अर्ज क्रमांक ३४५/२०२३ संदर्भात मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक १६ मे, २०२३ रोजीच्या आदेशान्वये ' **बी.ई./बी. टेक.[Production Engineering]** ' पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता अर्ज सादर करण्याची मुभा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर मूळ अर्जावरील मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ या संवर्गाकरीता **'बी.ई./बी. टेक.[Production Engineering]'** पदवीधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे :-

**२.१** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेतील इतर सेवांकरीता अर्ज सादर केलेल्या तथापि, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ करीता विकल्प सादर करू शकले नाहीत अशा **बी.ई./बी. टेक.[Production Engineering]** पदवी धारक उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईल मध्ये प्रस्तुत संवर्गाकरीता Recheck Eligibility या पर्यायाद्वारे पात्रता तपासून पात्र असल्यास केवळ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता विकल्प सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**२.२** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेकरीता अर्ज सादर केला नाही तथापि, नव्याने सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ करीता अर्ज सादर करण्यास इच्छुक असतील अशा फक्त **बी.ई./बी.टेक.[Production Engineering]** पदवी धारक उमेदवारांकरीता केवळ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता अर्ज सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता वर नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक १८ मे, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक २१ मे , २०२३ रोजी २३.५९ पर्यंत** |
| २ | **ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक २१ मे, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक २२ मे, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २३ मे, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सनिव २०१३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय राहील.

५. प्रस्तुत शुद्धिपत्रकास अनुसरून सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना फक्त **नवी मुंबई** येथील परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

६. इतर सर्व अटी व तरतुदी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

७. सदर शुद्धीपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई